वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस ठाणे,
पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड
पत्ता.-भक्ती शक्ती चौक निगडी पुणे ४११०४४.
फोन नं.- ०२०-२७६५५०८८,
ईमेल-psnigadi.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट**

## दहशत निर्माण करण्यासाठी खुन करणाऱ्या ७ जणांचे टोळीला जन्मठेपेची कठोर शिक्षा

निगडी पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील कुख्यात गुंड नामे प्रकाश लक्ष्मण चव्हाण याची दहशत संपवुन स्वतःचे गँगचे (टोळीचे) वर्चस्व निर्माण करण्याकरता, आरोपी प्रकाश सिंग बायस याने त्याचे टोळीतील साथीदार नामे दिलीप विठ्ठल कांबळे, अनिल लक्ष्मण सपकाळ, अमोल नारायण शिंदे, अमर दिनकर शेवाळे, शाम चंद्रकांत जगताप व संजय नारायण शिंदे यांनी मिळुन कट रचुन दि. १०/१२/२०१४ रोजी आरटीओ ऑफीस मागे, पुर्णानगर चिंचवड पुणे येथे सायं. १८:३० वा. चे सुमारास, प्रकाश चव्हाण याच्यावर व इतरांवर पिस्तुलमधून गोळया झाडून व हत्यारांनी वार करून ठार मारलेने निगडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होता. दाखल गुन्हयाचे तपासामध्ये वरील आरोपी निष्पन्न करून, अटक करून गुन्ह्यात खुन करण्याकरता वापरलेले पिस्टल व इतर हत्यारे गाड्या तात्काळ जप्त करण्यात आले होते. सदर गुन्ह्याचे तपासात आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा प्राप्त करून गुन्ह्याचे तपासी अधिकारी तात्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. बी. नाईकपाटील व पोलीस निरीक्षक आर. बी. उंडे यांनी आरोपीविरूध्द वेळेत दोषारोपपत्र पाठविले होते.

सदर आरोपीतांविरूध्द मा. जिल्हा न्यायाधिश व सत्र न्यायाधिश श्री. ए. एस. वाघमारे, शिवाजीनगर न्यायालय, पुणे यांचे समक्ष सुनावणी झाली. आरोपींतांविरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी, सरकारी अभियोक्ता श्री. वाडेकर तसेच मा. वपोनि निगडी पोस्टे यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे पोलीस उप निरीक्षक गोवींद मरभळ, व पोहवा २५१८ जगताप यांनी योग्य ती कार्यवाही केल्याने, मा. न्यायालयाने आरोपीतांना पोलीसांनी केलेला योग्य तपास व सादर केलेल्या पुराव्याचे आधारे खुनाकरीता जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली आहे. आरोपीतांना शिक्षा लागण्याकरता पोलीस दलाकडुन करण्यात आलेल्या प्रयत्नांबद्दल सर्व सामाजीक संघटना व समाजातुन निगडी पोलीसांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त श्री. डॉ. शशीकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, परि. १, श्रीमती स्वप्ना गोरे, यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शत्रुघ्न माळी, पोलीस निरीक्षक श्री. बिलाल शेख, पोलीस उपनिरीक्षक गोवींद मरभळ, पोलीस अंमलदार अनिल जगताप यांनी केली आहे.